# प्रकरण तिसरे

## आनंदीबाई शिर्के यांची जीवन गाथा

# प्रकरण - तिसरे

## आनंदीबाई शिर्के यांची जीवन गाथा --

' सांजवात ' म्हणजे आनंदीबाई शिर्के यांनी आपल्या जीवनाच्या उत्तरार्धातल्या आयुष्यात प्रज्वलीत केलेली जीवनाची सांजवात. मात्र ' सांजवात ' या नावातच प्रतिकात्मता आढळते. दिव्यापुढे संध्याकाळच्या वेळी लावलेली ' सांजवात ' पण सकाळ पासून संध्याकाळपर्यन्त झालेल्या घटनांनाही कांही वेळेला तितकेच महत्व आहे. प्रा.चंद्रकुमार नलगे आणि डॉ.गंगाधर पानतावणे या संपादकानी लिहिलेल्या ' स्त्री आत्मकथन ' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ' आत्मचरित्र हे आत्मकथन असते असे स्पष्ट केले आहे. म्हणजे ' सांजवात ' आत्मचरित्र देखिल आनंदीबाई शिर्के यांनी सांगितलेली आत्मकथाच ' आत्मकथनकाराच्या जीवनातील प्रत्येक घटने मागे योजकता, हेतूपूर्वकता, किंवा निश्चितता असतेच असते '[१].

आनंदीबाई शिर्के यांनी आपल्या आत्मचरित्रात आपल्या जन्मापासून ते आपल्या मिळालेल्या मोठया हुद्दा पर्यन्तचा जीवन पट काही काही आठवणींच्या माध्यमातून साकार केलेला आहे. त्या अनुषंगानी त्यांच्या जीवनाच्या स्वरुपावर न कळत प्रकाश पडू शकतो. शिवाय त्यांच्या जीवनचरित्रा बरोबरच त्याना अनुभूतीला आलेल्या अनेक घटनांचे, कांही समस्यांचे त्यासाठी कराव्या लागलेल्या संघर्षाचे नकळत दर्शन ही घडते. तेव्हा त्यांच्या जीवन चरित्राच्या अनुषंगानी तत्कालीन सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, साहि इत्यादी गोष्टीवर नकळत प्रकाश पडतो. त्यामुळे मालचंद्र फडके यानी ' श्रीमती आनंदीबाई शिर्के यांचे ' सांजवात ' थोडेसे ऐस पैस झालेले आत्मचरित्र आहे '[२] असे म्हटले असले तरी आनंदीबाई स्वत:च लिहितात ' आपल्या जीवनात झालेल्या घटना मुलांना उलगडून सांगाव्यात म्हणून माझ्या आयुष्यात जे, जे घडले ते, ते मी लिहून काढले.[3]

त्यासाठी लेखिकेने आपल्या शारीरिक व्याधी,व मानसिक व्यथांचा विचार न करता गतकाळातील जीवनाशी त्या इतक्या समरस झाल्या की त्यामुळे 'जणू ते जीवन मी आता पुन्हा नव्याने जगत आहे' ही समरसता कलावंताच्या निर्मिती मागे असणे आवश्यक आहे. आत्मचरित्र लिखाण हे प्रयोजनवत असले तरी त्या घटनांची केलेली मांडणी,त्याला दिलेला जिवंतपणा हा आत्मचरित्रकारांच्या भावनेचा तो उत्कट अविष्कार असतो. त्यामुळेच त्याला कलात्मकता प्राप्त होत जाते. शिवाय वि.द.घाटे यांच्या सांगण्यानुसार त्यांनी ही आपली 'सांजवात' प्रज्वलीत केलेली आहे अशा आत्मचरित्रातून आढळणारा त्यांचा जीवनपट .

## जन्म व बालपण --

आनंदीबाई शिर्के यांचा जन्म ३ जून १८९२ साली बडोदा या गांवी झाला हा कालखंड महाराष्ट्र संस्कृतीच्या जीवन घडणीच्या दृष्टीकोनातून वैचारीक कालखंड मानला जातो. आनंदीबाईंचा जन्म शिंद्यांच्या खानदाणी कुटुंबात झाला. तेथील राजघराण्यात गायकवाड सरकारांच्या उदारमतवादी पुरोगामी वातावरणात त्यांचे बालपण गेले, बालपणापासून वडिलांची ती लाडकी होती. वडिलांनी तिला आपला मुलगाच मानला होता. शिवाय आनंदी-बाईंच्या जन्मामुळे त्यांच्या घरात आनंदाचा सुगंध दरवळला त्या एक लाडूबाई म्हणूनच वावरू लागल्या.

## शिक्षण --

बालपणाचा आनंद ओसरून,आनंदीबाई शालेय शिक्षणाच्या वातावरणात वावरू लागल्या पण त्या काळात आजच्या सारख्या शिक्षणाच्या शाळा गावा गावात नव्हत्या,शिक्षण मिळणे व घेणे अतिशय अवघड बाब पण वडिलांच्या प्रेमाखातर आणि दादांच्या हट्टाखातर शालेय जीवनात प्रवेश मिळाला. आणि माझ्या जीवनाच्या वाटचालीला एक वेगळे वळण लागले.' लहान मुले जिच्यासाठी आसुसलेली असतात ती माया दादांच्या करडेपणामुळे आमच्या घरांत जरा पातळ झाली होती.'[४] ती आनंदीबाईंना हेडमिस्ट्रेस चंपूबाई जयकर यांच्या

प्रेमळपणामुळे मिळाली. त्या मुळातच सुंदर प्रेमळ व हसत मुख असल्यामुळे आंनंदी-बाईंच्या मनावर चांगला परिणाम झाला. त्यामुळे नकळत शिक्षण घेण्यात ओढ वाटू लागली. अभ्यास तितकाच चांगला सूक्ष्म होऊ लागला. स्मरणशक्ती तीव्र झाली शिवाय घरातील पण लक्षात कोण घेतो कादंबरीतील रोज दोन दोन पाने वाचून घेतल्यामुळे शाळेत आनंदीबाईंचा नंबर वरचा असे पण त्या स्वत: म्हणतात " त्या प्रमाणे तो शाळेत असे पर्यन्त टिके दादांच्या दंडुक शाही मुळे येत असेल ते आठवेनासे होई " ५ म्हणजेच दंडूक शाहीमुळे किंवा जरबेमुळे मनुष्याच्या मनावर कधी कधी वाईट परिणाम ही होऊ शकतो ही गोष्ट या लेखिकेला आजच्या काळाच्या दृष्टीने देखील जाणवून द्यायचे असावे. तरी पण या शिक्षणामुळे आणि घरातील वातावरणामुळे एक शिस्त लागली उदा. लवकर उठणे, प्रातर्विधी, वेणी - फणी, स्नान न्याहारी आटोपून शाळेत जाणे घड्या तयार असणे शिवाय घरात वाटून दिलेले काम प्रत्येकांनी करणे ही करडी शिस्त पण जीवन विकासाच्या दृष्टीने त्या काळातील ते शिक्षण म्हणावे लागेल, शिवाय तमाशा सारख्या कलेला पाहणे मनाई असे. कीर्तन ऐकण्यास परवानगी मिळे. आनंदीबाईंचे शिक्षण मराठी शाळेतून जसे झाले तसे गुजराथी शाळेतूनही झाले. मुंबईत असताना चाळीच्या शाळेत गेल्यावर त्यांना काही युरोपियन स्त्री शिक्षकांच्याकडून काही शिक्षणाच्या कला, मिळाल्या. त्याच बरोबर प्रेमळ वागणूकही युरोपियन शिक्षिका माझी फार लाड करीत पेपर खेळणी, पेपर मिंट देत मराठी गोड बोलत गाणी शिकवत. ती गाणी येशु ख्रिस्ताची असत " ६ परंतु " मडमीणीच्या शाळेत जायच नाही लोक तुला बाटवतील पण त्या काळात आनंदीबाई याचे बाटवणे " या शब्दाचा अर्थ कळण्या इतपत वय नव्हते त्यामुळे त्यांची शाळा बंद होऊन त्यांच्या वडिलांनी त्याना एका खोलीतील मुलामुलींच्या पंतोजीच्या गुजराथी शाळेत घातले. त्यामुळे गुजराथी ही भाषा मला लिहिता वाचता येऊ लागले. श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड महाराज या उदार प्रेरणेमुळे आपल्या सारख्या स्त्रियांना मोफत शिक्षण मिळे. तिथे तिसरी पर्यन्त शिक्षण झाले अशा तऱ्हेने पुढे शाळेच्या वातावरणात आणि घरातील वातावरणात शिक्षण

मिळत होते. पुस्तकी ज्ञाना बरोबरच भरत काम, शिवणकाम, आणि विणकाम, यांचे ही त्याना शिक्षण मिळाले पण सर्टिफिकेट नसल्यामुळे त्याना शिक्षकी पेशात त्याना प्रवेश मिळू शकला नाही.

त्याना त्या काळात गायकवाड सरकारांच्या मुळे शिक्षण मोफत मिळण्याची सोय झाल्यामुळे आम्हा सारख्या मुलींचे शिक्षण होऊ लागले. जीवनाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी आत्मसात करता येऊ लागली आम्हा बरोबर राजघराण्यातील मुली सुध्दा शाळा शिकत होत्या. त्याचा आम्हा त्यांना आम्हा सामान्य नागरिकांचे ज्ञान झाले की नाही कोण जाणे पण त्यांच्या सहवासाने मला मात्र मोठ्या लोकांच्यात मोठ्या गोष्टींचं ज्ञान होऊ लागले होते ( सांजवात । पृ. ४२ ) त्याच प्रमाणे बाबांच्या बदलीमुळे आम्हा मुलींची गांव, शाळा, शिक्षण, वातावरण, संस्कार परिस्थिती या सर्व बाबतीत बदल होत राहिल्याने आनंदीबाईच्या जीवन गाथेला एक वेगळ्या तऱ्हेने आकार प्राप्त होत गेला.

शिक्षणा बरोबर घरातील धार्मिक वातावरणामुळे देखिल मनाची घडण होत गेली. गुजराथी स्त्रियांच्या सहवासात आल्यामुळे त्यांच्या काही धार्मिक संस्काराचाही परिणाम आनंदीबाईच्या जीवनावर झाला. एका बाजूला दादांचा माणसाला विद्या आलीच पाहिजे, विद्येला वयाची मर्यादा नाही असा हट्ट असे त्यासाठी आपल्या पत्नीला शिकवण्याचा जसा प्रयत्न त्याच प्रमाणे संस्कारशील मन बनविण्यासाठी धार्मिक गोष्टींची आवश्यकता ही जीवनात आवश्यक आहे असा त्यांचा हक्काचा शब्द असे. घरात रुक्मिणी, स्वयंवर, सीता स्वयंवर उषा चित्र दर्शन किंवा उषाहरण गुजराथी पोथी किंवा ओकाहरण वाचून घेतले जाई त्याच प्रमाणे गुर्जर मुली चैत्रात अलुणाव्रत करीत अलुणा म्हणजे अळणी पांढरे अन्न म्हणजे भात दही, दूध खायचे पण मीठ खायचे नाही या व्रताची आम्हाला दीक्षा मिळाली होती ( सांजवात । पृ. ४५ ) त्यांच्या श्रध्दा, शिवण कलेचा संस्कार माझ्या मनावर झाला. हरितालिका व्रत करावे, नामकरण करावे अध्यात्मिक जाणीवेतून आत्मज्ञानाचा विकास व्हावा त्या दृष्टीने अशा

गोष्टीची आवश्यकता प्रत्येकाच्या जीवन घडणीत असावी असा कदाचित आनंदीबाईंचा हा विचार मांडण्यामागे उद्देश असावा. आईच्या धार्मिक संस्कारामुळेच आम्हा मुलींच्यावरही तसा संस्कार झाला. न कळत मी ही वेलींचा फुलांचा दुर्वांचा लक्ष वाहू लागले. देवदर्शनाला जाऊ लागले.कार्तिक स्नान माघ स्नान सुध्दा करु लागले. शेजाऱ्यांना धार्मिक नावे शिकविली 'ध्रुवाख्यान', 'थाळे' इत्यादी ( सांजवात । पृ.५३ ) आमचा एकच उद्देश तत्कालीन, परिस्थिती प्रमाणे हिंदू मुलींच्या मनावर ख्रिस्ती धर्माचा ठसा उमटू न देता हिंदू संस्कृतीच जोपासावी असा वाडवडिलांचा आनंदीबाईंच्या जीवनाला घडविण्यामागे दृष्टीकोन होता. त्यांना त्याची गरज होती.

नोकरी --

वडिलांच्या गरिबीमुळे आनंदीबाईंच्या मनात असे क्रांतिकारक विचार येऊन गेलेत. हुंडा देण्यात इतपत आपल्या वडिलांच्याकडे पैसा नसल्यामुळे आनंदीबाईंनी परिचारिकेची नोकरी करण्याचा मानस घरात बोलून दाखविला 'मला नर्सिंग शिकायचे आहे लग्न करावयाचे नाही, कधी करावयाचे कोणाला निवडायचे ते मी ठरवणार' ( सांजवात । पृ.८९ ) असा स्पष्ट विचार आनंदीबाईंनी डॉ.बागडे याना सांगितला.आपल्या मनातील हा भाव चंद्राबाईंच्याकडे बोलून दाखविला.परंतु नोकरी करण्यास घरातल्या लोकांच्या विरोधामुळे आनंदीबाईंना तो विचार सावणाच्या फुग्या सारखा सोडून द्यावा लागला. त्याचप्रमाणे शिवणकाम ,भरतकाम,विणकाम,यांचे चांगले ज्ञान असूनही त्यांच्या साह्याने आपल्या वडिलांना पैशाच्या स्वरुपात मदत करता येईल हा उदात्त विचार मनात असूनही सर्टिफिकेट नसल्यामुळे वडिलांना मदत करण्याचा विचार आनंदीबाईंना मनातच दाबून ठेवावा लागला ते शल्य त्याना सतत बोचत राहिले,ती खंत त्यांच्या मनाला लागून राहिली.

आणि म्हणूनच स्त्रियांना आपल्या पायावर उभ्या राहता येईल अशा कोणत्या तरी एका कलेचे शिक्षण अगदी आवश्यक आहे असे महर्षी अण्णासाहेब

कर्वे यांनी वाटल्याने त्यानी आपल्या पत्नीला नर्सिंगचा कोर्स दिला होता. मात्र आनंदीबाईंना त्यांच्या वडिलांनी घेऊन दिला नव्हता. त्यामुळे मुलींचा जन्म हाच आपल्या आई-वडिलांना त्रास आहे असे आनंदीबाईंना राहून राहून वाटत होते. घरच्या आर्थिक परिस्थितीची तीव्र जाणीव आनंदीबाईंना असल्यामुळे त्यांच्या विवाहाला कसून विरोध होत होता. पण वडिलांच्या खातर आणि मुलींच्या जन्माखातर आपले आयुष्य नसून ते दुसऱ्यांच्यासाठी आहे हा विचार करून त्यानी विवाहाला मान्यता दिली. या धार्मिक संस्काराच्या मागे उद्देश असावा अशा या संस्कारशील घरात जन्म झालेल्या आनंदीबाईंचा विवाह वयाच्या विसाव्या वर्षी झाला.

विवाह --

आनंदीबाईंच्या विवाहाला सामाजिक महत्व आहे. समाजातील संघर्षाला तोंड देऊन व घरच्या गरिबीच्या परिस्थितीमुळे आनंदीबाईंनी आपला विवाह जाणून बुजून लांबवणीवर टाकला. देशस्थ आणि कोकणस्थ, मराठा समाजात या विवाहामुळे छोटे वादळ निर्माण झाले. शिवराम शिर्के यांच्या धाडसी विचारामुळे त्यांच्या प्रेमामुळेआणि त्यांच्या वरील प्रेमामुळे लग्नाची इच्छा नसतानाही आनंदीबाईंनी आपल्या सर्वस्वाच्या जीवनाची माळ शिर्क्यांच्या गळ्यात घातली ती वयाच्या २०व्या वर्षी. तोही आनंदीबाईंच्या वैचारिक आणि बंडखोर वृत्तीचा एक विशेष म्हणावा लागेल. त्याच बरोबर मी आवडलेल्या पुरुषांशी लग्न करीन पण हुंडा देणार नाही हा ही त्या काळातील एक परखड विचार म्हणावा लागेल मात्र हुंडा न देण्यामागे आनंदीबाईंचा जो हेतू होता तो म्हणजे आपल्या वडिलांचे दारिद्र्य. त्या दारिद्र्यामुळेच आनंदीबाईंच्या विचाराला आणि जीवनाला एक वैशिष्ट्य पूर्ण वळण लागले. आणि आनंदीबाईंचा विवाह १८ डिसेंबर १९१३ रोजी म्हणजे शके १८३५ गुरुवारी गोरज मुहूर्तावर संध्याकाळी ७-३० वाजता थाटामाटानी झाला. त्या वेळी देशस्थ कोकणस्थ विवाह झाले पाहिजेत ( सांजवात । पृ.१३० ) अशी सुधारणावादी भाषणे झाली. मुक्त जीवन संपवून जबाबदारीच्या जीवनाला प्रारंभ झाला. विवाहाच्या वेळी अनेक

जातीची माणसे उपस्थित होती. विवायाच्या संदर्भात आनंदीबाईंनी शिवराम पंताच्या बरोबर विवाह करून आपल्या जीवनाला एक वेगळी कलाटणी दिली. हे जरी खरे असले तरी हुंडा न घेणाऱ्याशीच लग्न करायचे असा मी निश्चय केला होता मी ( सांजवात । पृ.११५ ) असे डॉ.बागवेना स्पष्टपणे सांगितले. हुंडा मागणाऱ्याना आनंदीबाईचे स्पष्ट उत्तर म्हणजे हुंडा पाहिजे ना त्याना सांगा मी मुळीच लग्न करायला तयार नाही ( सांजवात । पृ.११९ )
तरी पण वडिलांच्या खातर आनंदीबाईंनी विवाह केला. आणि एका नव्या जबाबदारीच्या जीवनात प्रवेश केला. आनंदीबाईच्या विवाहानंतर त्यानी शिर्केच्या संसारात पदार्पण केले. आणि त्या आनंदीबाई शिर्के झाल्या. प्रेमळ सासू, सासरे यांच्या बद्दल आनंदीबाई म्हणतात की सासू सासरे किती प्रेमळ होते. यांच्यावर किती प्रेम होते. जरी सर्व मावांच्या मध्ये लहान असले तरी साऱ्यानाच त्यांच्याबद्दल आदर होता सासूबाई तर अतिशय साध्या सरळ पापभीरु, त्यांच्या ठिकाणी मनाचा मोठेपणा होता. त्यांच्या मानी आणि सरळ स्वभावामुळे सर्व घरीदारी त्या सर्वांनाच हव्या होत्या. सासरची मंडळी माझ्या बरोबर कशी वागतील याची मला भीती वाटे. पण सर्वांच्या चांगुलपणामुळे माझ्या मनात असणारी भीती नाहीशी झाली. ( सांजवात । पृ.१७६ )

सासू, सासरे यांच्या प्रेमळ स्वभावाचे वर्णन करीत असतानाच आनंदीबाई आपल्या आजे सासरे यांच्या स्वभावाचे चित्रण करतात. त्यांचे आजे सासरे देखील शिस्तीचे मोक्ते, जरी ते जमदग्नी वाटत असले तरी, खरे तर ते फार प्रेमळ व देवभक्त ते शिवभक्त होते ( सांजवात । पृ.१७८ )
आनंदीबाईच्या पतीवर लहानपणापासून त्यांची करडी नजर होती. स्वत: कष्टात राहून आपल्या मुलाला, नातवाला त्यानी शिकविले. पतीची प्रेमळ माया, त्यांचे साहित्यिक अंतरिक मन असल्यामुळे त्यांच्याकडे येणारी इतर साहित्यिक त्यांच्यामुळे होणाऱ्या ओळखी, शिर्के स्वत: संपादक असल्यामुळे आनंदीबाईच्या व्यक्तिम--
- त्वावर झालेले साहित्यिक संस्कार बालपणापासून घरात संतसाहित्याचे वाचन पण लक्षात कोण घेतो सारखी कादंबरी वाचून घेतली असल्यामुळे आनंदीबाईचे

व्यक्तिमत्व देखील साहित्यिक निर्मितीकडे वळले. त्यानी काही कथा लिहिल्या त्यातील पहिली गोष्ट ` शारदाबाईचे संसार चित्र ` तर मनोरंजन मासिकातून त्यानी काही निबंधही लिहिले. प्रारंभी मोबदला मिळण्याची आशा होती पुढे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, रा.ग.गडकरी , विठ्ठल रामजी शिंदे, लक्ष्मीबाई टिळक, यांच्यासारख्या साहित्यिकांच्या सहवासात आल्यामुळे आनंदीबाईंच्या साहित्यिक व्यक्तिमत्वाची जडणघडण झाली. त्या एकंदरीत संस्कारीत अविष्कारामुळेच आणि आंतरिक कलावंताच्या व्यक्तिमत्वामुळे आनंदीबाई आपले स्वतःचे आगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आत्मचरित्र लिहू शकल्या. पतीच्या सहवास आणि स्वतःच्या लालित्य पूर्ण जीवनानुभूतीमुळेच त्यांचे आत्मचरित्र ही मराठी साहित्याच्या प्रांगणात आपले स्वतःचे अस्तित्व निर्माण करु शकल्या. यामुळेच त्याना मोठेपण प्राप्त झाले.

## मोठेपण --

आनंदीबाईंच्या कष्टांतून साकार झालेल्या जीवनाला हृदयाचा स्पर्श लाभल्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व अधिक उठून दिसते. १९३६ साली जळगांव येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्षा झाल्या, तर ऑननरी मॅजिस्ट्रेट म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्या जे.पी.झाल्या, त्यामुळेच त्यांच्या एक्यानणव्या (९१ ) वर्षी महाराष्ट्र शासनातर्फे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार समारंभ झाला. शिवाय ` सुंदर माझे घर ` या सदरांत त्यांची मुलाखत झाली. म्हणून आनंदीबाईंच्या जीवनाची पाऊल वाट ही मराठी साहित्य विश्वात उठून दिसू लागली. १९९२ साली त्यांची जन्मशताब्दी साजरी झाली. त्यांच्या जीवनाचे व साहित्यिक गुणांचे कौतुक झाले

## पतीविरह - एकाकीपण --

शिवराम शिर्क्यांच्या जीवनात सहधर्मचारिणीचा वसा पत्करला तो त्यांच्या जीवनाच्या सावलीतून वाटचाल करत असताना समाजाकडून झालेल्या संघर्षाबाबत त्याना काहीच वाटले नाही. शिवराम पंतांच्या शेवटच्या

आजारपणात त्यानी त्यांची मनोभावे सेवा केली. शिवराम पंतानी आपल्या व्यथा वेदनांचे जास्त प्रदर्शन केले नाही.आनंदीबाईना शेवट पर्यन्त त्यांच्या पतीनी सतत लिहित ठेवले. ` घरातही चिंतेचे वातावरण होते.यांच्या प्रकृतीची स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली होती.आम्ही सारी त्याना जपत होतो डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाणे शुश्रुषा करीत होतो. परंतु शारीरिक व्याधीचे काय ? ती त्यानाच सोसावी लागत होती` ( सांजवात । पृ.३३० )
या काळात आनंदीबाईंच्या दु:खी जीवनात त्यांच्या टीनी कन्नीने मनोभावे साथ केली पण शिवरामपंत शिर्के यानी मृत्यूपूर्वी ` मूकपणेच आईच्या फोटोला हात जोडले आणि बुधवार ता.१६ माहे सप्टेंबर १९६४ रोजी सकाळी दहा वाजता ते मला सोडून गेले. गेली पन्नास वर्षे सावली सारखी त्यांच्या बरोबर वावरणारी मी आता या अफाट जगात एकटी अगदी एकटी पडले` ( सांजवात । पृ.३३१ )

जीवनाची सांजवात लावून बसलेल्या एकट्या आनंदीबाईना पती सहवास दूर झाल्यानंतरचा जाणवणारा एकाकीपणा त्यानी तितक्याच करुणारसपूर्ण वर्णनातून प्रांजळपणे निवेदन केला आहे. भारतीय संस्कृतीतील स्त्रीला पतीविरह किती पोरका बनवतो याचे हे उदाहरण म्हणावे लागेल . आनंदीबाई म्हणतात ` माझे मन स्थिर करण्यात यांचा वाटा फार मोठा आहे` ( सांजवात पृ.३३२)

## संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १ | प्रा.चंद्रकुमार नलगे व<br>डॉ.गंगाधर पाणतावणे<br>स्त्री आत्मकथन (प्रस्तावना )<br>सुरेश एजन्सी<br>२०५,शुक्रवार पेठ,पुणे ४११ ००२<br>प्र.आ.जुलै १९९० | पृ.३ |
| २ | भालचंद्र फडके<br>मराठी लेखिका चिंता आणि चिंतन<br>श्री विद्या प्रकाशन २५० शनिवार पेठ<br>पुणे, ३० ,आवृत्ती पहिली,मार्च १९८० | पृ.१६४ |
| ३ | तत्रैव | पृ.१६४ |
| ४ | तत्रैव | पृ.२७ |
| ५ | तत्रैव | पृ.२७ |
| ६ | तत्रैव | पृ.१६ |
| ७ | तत्रैव | पृ.४२. |